CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार दि. ५ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ३९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८






# नेतान्याहू यांचा दबदबा

सार्‍या जगाचे लक्ष लागून असलेल्या प. आशियातील छोट्याशा इस्रायल या देशातील सार्वत्रिक निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे माजी पंतप्रधान बेन्यामिन नेतान्याहू हेच पुन्हा सत्तेवर आले. त्यांच्या पक्षाला मिळालेले बहुमत पाहाता तेच पंतप्रधान होणार, हे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत असून भारतालाही नेतान्याहू यांच्या नेतृत्वाचा चांगला लाभ होईल.त्यामुळे भारती त्यांच्या निवडीवर समाधानी नक्कीच असेल. अत्यंत अस्थिर अशा इस्रायली राजकारणामध्ये त्यातल्या त्यात टिकाऊ आघाडी स्थापन करून कायदेमंडळात साधे बहुमत स्थापण्याची संधी नेतान्याहू यांचा लिकुड पक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या आघाडीला सर्वाधिक आहे. नेतान्याहू यांचे इस्रायलमध्ये पुन्हा सत्तेवर येणे या संपूर्ण टापूच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे ठरेल. त्यांच्या राष्ट्रवादी धोरणांना धर्मवादी पक्षांची जोड मिळाल्यामुळे इस्रायल-पॅलेस्टाइन ध्रुवीकरण अधिक ठळक बनेल, अशी शक्यता वर्तवली जातेय. इस्रायली कायदेमंडळात (क्नेसेट) १२० जागा असतात, पण गेल्या काही वर्षांमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमताचा ६१ हा आकडा स्वबळावर गाठता आलेला नाही. किंबहुना लिकुड आणि इतर विरोधी पक्षांना आघाडया करून देखील ६१ जागा गाठताना आणि त्या राखताना अनंत कसरती कराव्या लागतात. पॅलेस्टाइनविरोध हे येथील प्रमुख उजव्या विचारसरणीच्या पक्षांचे हक्काचे शस्त्र. परंतु त्याचे स्वरूप काय असावे या मुद्द्यावर तेथील अनेक उजव्या विचारसरणीच्या पक्षांमध्ये तीव्र मतभेद असतात. सत्तारूढ पक्षाला पॅलेस्टिनीविरोधी धोरणे आंतरराष्ट्रीय दबावामुळे सरसकट राबवता येत नाहीत. पण या मुख्य प्रवाहातील पक्षांना अनेकदा छोट्या, अतिकडव्या पक्षांचा पाठिंबा घ्यावा लागतो. सरकारमध्ये राहूनही सरकारची धोरणे पटली वगैरे नाहीत, की पाठिंबा काढून घेण्याचे आणि सरकार अल्पमतात येण्याचे प्रकार तेथे नित्याचे. परिणामी आणखी एखादी निवडणूक ही शक्यता नाही आणि त्यामुळे निवडणुका घ्याव्या लागली, हे तेथे गेल्या पाच वर्षांत चौथ्यांदा घडले.



मतदानोत्तर चाचण्यांमध्ये नेतान्याहू आणि मित्रपक्षांना मिळून ६१ ते ६२ जागा मिळतील, असे भाकीत वर्तवले गेले. प्रत्यक्ष मतमोजणीनंतर हा आकडा ६५च्या जवळपास जाईल, असा अंदाज होता,तो खरा ठरला. इस्रायली राजकारणात तो बऱ्यापैकी स्थिर मानला जातो. नेतान्याहू यांच्यासोबत असलेले इतमार बेन-ग्विर हे अत्यंत विभाजनवादी व्यक्तिमत्त्व मानले जाते. ज्युइश पॉवर पार्टीचे हे नेते वंशद्वेषी मानले जातात. अरबविरोधी वक्तव्ये आणि कृती करणे, अमेरिकेने दहशतवादी ठरवलेल्या कडव्या यहुदी संघटनांमध्ये सक्रिय असणे, इस्रायलशी निष्ठावान नसलेल्यांना देशाबाहेर हाकलून देणे अशी कृत्यांबद्दल त्यांना मुख्य प्रवाहातून जवळपास हद्दपार करण्यात आले होते. मात्र नेतान्याहू यांच्या पाठबळावर त्यांचे राजकीय पुनरुत्थान झाले असून, ही व्यक्ती आता सरकारमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. रिलिजियस झिओनिझम पक्षाचे बेझालेल स्मॉट्रिच यांनी 'पॅलेस्टिनी भूमीवरील इस्रायली वसाहतींमध्ये पॅलेस्टिनींचा खून होणे हा दहशतवाद असूच शकत नाही' या स्वरूपाची वादग्रस्त विधाने केलेली आहेत. समलिंगींविरोधात त्यांनी जेरुसलेममध्ये जाहीर मोर्चाही काढला होता. अर्थात या दोन्ही नेत्यांशी नेतान्याहू यांनी यापूर्वी दोन वेळा आघाडी केली होती. परंतु त्यावेळी नेतान्याहू बहुमतापासून दूर होते. आता तशी परिस्थिती नाही.इस्रायलचे आगामी सरकार लोकशाहीवादी असेल, की यहुदीवादी असा प्रश्न वैचारिक वर्तुळातून उपस्थित केला जात आहे. पॅलेस्टाइनशी अनेक मुद्द्यांवर प्रलंबित आणि रक्तलांछित सीमावाद सुरू आहेत. जेरुसलेमला इस्रायलची राजधानी घोषित करणे, गोलन टेकड्यांवर स्वामित्व जाहीर करणे, गाझा पट्टी आणि पश्चिम किनारपट्टीमधील इस्रायली वसाहतींना एकतर्फी कायदेशीर ठरवणे आदी धोरणे नेतान्याहू यांच्या आधीच्या कार्यकाळात राबवली गेली होती. त्यावेळी नेतान्याहू यांच्या पाठीशी अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प होते. मात्र ज्यो बायडेन यांच्यासारखे डेमोक्रॅट अध्यक्ष नेतान्याहूंच्या असल्या कृत्यांना पाठिंबा देण्याची शक्यता कमीच. गेल्या दोन वर्षांमध्ये अब्राहम करार, त्याचबरोबर यूएई, मोरोक्को, इजिप्त यांच्याबरोबर राजनैतिक संबंध पुनर्प्रस्थापित झाले होते. उजवीकडे पूर्ण झुकलेल्या इस्रायली सरकारच्या बाबतीत मित्रत्वाची ती भावना अरब देश अंगीकारणे शक्यच नाही. भारताच्या बाबतीत बोलायचे झाल्यास बेन्यामिन नेतान्याहू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात वैयक्तिक सौहार्दाचे संबंध आहेत. ते पुन्हा प्रस्थापित होतील. संरक्षण सामग्री, नवीकरणीय ऊर्जा अशा क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य वाढीस लागून त्याचा फायदा दोन्ही देशांना होईल.तंत्रज्ञानात इस्त्राईल प्रगत असल्याने त्या देशाची सार्‍या जगाला गरज भासणार आहे.

# 'हायपरऑटोमेशन'चा स्ट्रॅटेजिक ऑक्सिजन!

'हायपरऑटोमेशन' हे निर्णय प्रक्रियेशी संबंधित तंत्रज्ञानाचे क्रांतिकारी नवे दालन आहे. खरंतर 'हायपरऑटोमेशन' हे नैसर्गिक बुद्धिमत्ता (एनआय) असणाऱ्यांना रोजगाराच्या संधींचा 'कुबेरी' खजानाच होय! 'हायपरऑटोमेशन' हा एक केवळ वाणिज्य किंवा विज्ञान तंत्रज्ञान शाखांच्या मर्यादेत कैद करता येणारा विषय नाही, तर 'हायपरऑटोमेशन' हा व्यवसायाला चालना देणारा शिस्तबद्ध, सृजनात्मक, कलात्मक व नावीन्यपूर्ण रंजक दृष्टिकोनही आहे. वोट बँकेचे राजकारण असो की शिक्षण वा अर्थकारण, सर्वत्र 'हायपरऑटोमेशन'चा वापर जगभर केला जातोय.

लवकरच 'हायपरऑटोमेशन' तंत्रज्ञान आपल्या सर्व शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट होत मानवी सभ्यतेच्या मूलभूत गरजा भागवत आव्हानांशी एकजुटीने दोन हात करताना दिसेल. जगाच्या नकाशात असा कुठलाही प्रदेश शिल्लक नाही जिथे व्यावसायिक व उद्योगधंदा वृद्धिंगत करण्यासाठी 'हायपरऑटोमेशन'रूपी 'स्ट्रॅटेजिक ऑक्सिजन'ची गरज नाही.

'हायपरऑटोमेशन' ह्या शब्दाचा उगम व संकल्पनेचा जन्म झाला तो अवघ्या दोन वर्षांपूर्वी! 'हायपर-ऑटोमेशन' हा शब्दप्रयोग गार्टनर ग्रुप इंक. या आयटी सल्लागार व संशोधन कंपनीचे संस्थापक गिडॉन यशया गार्टनर (१३ मार्च, १९३५ - १२ डिसेंबर २०२०) यांनी २०२० साली सर्वप्रथम केला. धोरणात्मक-व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापनातील नंबर एकवर असलेला ट्रेंड असे त्यावेळी म्हटले गेले. डिजिटल प्रोसेस ऑटोमेशन (डीपीए) किंवा बुद्धिमान म्हणजेच इंटेलिजन्स ऑटोमेशन (आयए) किंवा ॲग्युमेंटेड ह्युमन (एएच) किंवा व्हॅल्यू ॲडेड ह्युमन (व्हीएएच) असादेखील 'हायपरऑटोमेशन'चा उल्लेख होतो.

**स्ट्रॅटेजिक डिसिजन्स!**

'स्ट्रॅटेजिक डिसिजन' म्हणजे एखादी घटना अथवा समस्या निर्माण होण्याची सर्व संभाव्य कारणे पाहून तसे होऊच नये यासाठी उचलावयाची पावले व घ्यावयाचे एक किंवा अधिक निर्णयांची श्रृंखला होय. यात महत्त्वाचे म्हणजे टाइम स्केलवर या निर्णयांची अंमलबजावणी कोणी कशी व कोणत्या परिस्थितीत किती वाजता, किती मिनिटांनी, किती मायक्रो किंवा नॅनो सेकंदांनी करावयाची इतके अचूक स्वयंचलित अंमलबजावणीचे यांत्रिकीकरण म्हणजे 'हायपरऑटोमेशन' होय. यांत्रिकीकरणाच्या या प्रक्रियेत सॉफ्टवेअर व हार्डवेअर असा दोघांचा मिलाफ म्हणजे एम्बेडेड सिस्टिम, मॅनेजमेंट कौशल्य व कसब तसेच बदलत्या भोवतालचे रियल टाईम (घटना घडत असतानाच) ज्ञान अद्यावत होणे, बिझनेस इथिक्स व पॉलिसी अशा कितीतरी गोष्टींचा समावेश होतो. परिणामी 'इंटरडिसिप्लिनरी' असेच हे 'हायपरऑटोमेशन' डिझाईन अँड इंप्लिमेंटींग अँड अपडेशन तंत्रज्ञान आहे.

**नफा रे नफा रे !**

कुठलाही बिझनेस किंवा व्यवसाय म्हटला की नफा किंवा रेव्हेन्यू महत्त्वाचा असतो. परंतु फक्त जास्त नफा मिळाला म्हणजे व्यवसाय सुरळीत आहे असे दरवेळी होत नसते. कारण उत्पादन साखळी, कार्य प्रवाह, वस्तू व सेवेचा दर्जा, विपणन म्हणजे मार्केटिंग प्रक्रिया, ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट आदी असंख्य घटक एखादा उद्योगधंदा



विश्वासार्हतेने शतकानुशतके सुरू राहण्यासाठी अत्यावश्यक असतात. उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळ यांचा कमी वेळेत सुयोग्य पद्धतीने पुरेपूर (ऑप्टीमम) वापर करीत ध्येय गाठण्याचे तंत्र-मंत्र आणि दृश्य-अदृश्य यंत्र म्हणजेच हायपरऑटोमेशन' हे होय! कुणी याला संकल्पना म्हणते तर कुणी याला टेक्नॉलॉजी म्हणते, परंतु यामुळे याचे महत्त्व जरादेखील कमी होत नाही हे विशेष!

**स्मार्ट पॅकेजिंग!**

'हायपर' म्हणजे उच्च तर 'ऑटोमेशन' म्हणजे जगण्यासाठी आवश्यक गरजेपेक्षा, जास्तीत जास्त सुख-सुविधा त्याही कमीत कमी वेळात तसेच कमीत कमी परिश्रमात मिळवण्यासाठी केलेली धडपड जेंव्हा यशस्वी होत स्वयंचलित तंत्रज्ञान विकसित होते ते म्हणजे 'ऑटोमेशन' होय. 'हायपरऑटोमेशन' म्हणजे असेच अत्युच्च तंत्रज्ञान होय. 'हायपरऑटोमेशन' हे एम्बेडेड कॉग्नेटिव्ह ॲबेलिटी (एकत्रित संज्ञानात्मक क्षमता) आणि बुद्धिमत्तेसह ऑटोमेशन साधनांचे हे 'स्मार्ट पॅकेजिंग'च होय.

**संधींचा कुबेरी खजाना!**

'हायपरऑटोमेशन' मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), मशीन लर्निंग (एमएल) आणि रोबोटिक प्रोसेस ऑटोमेशन (आरपीए), इव्हेंट-ड्रिव्हन सॉफ्टवेअर आर्किटेक्चर, व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन (बीपीएम), बिझनेस लॉजिक टूल्स, डेटा ॲनालिसेस आणि बुद्धिमान व्यवसाय प्रक्रिया व्यवस्थापन सूट, सेवा म्हणून एकीकरण प्लॅटफॉर्म, प्रोसेस मायनिंग, डिजिटल इम्यून सिस्टिम, क्लायंट ॲक्शन टाईम आयडेंटीफिकेशन, लो-कोड/नो-कोड साधने, पॅकेज केलेले सॉफ्टवेअर आणि इतर अनेक प्रकारचे निर्णय, प्रक्रिया आणि कार्य ऑटोमेशन साधने आदींचा समावेश होतो. यांच्या उपयोगाने व्यवसाय प्रक्रिया स्वयंचलित करीत 'इफेक्टिव्हनेस' व 'इफिशियन्सी' वाढविणे ह्या उद्देशाने परिवर्तनासाठी पावले उचलली जातात. परिणामी हायपरऑटोमेशन हे रोजगार संधींचा कुबेरी खजानाच आहे.

**तुम्हांला ही गरज आहे!**

'हायपरऑटोमेशन'चा वापर कुठलीही संस्था शक्य तितक्या व्यवसाय आणि आयटी प्रक्रिया स्वयंचलित पद्धतीने जलद करण्यासाठी करतात. 'हायपरऑटोमेशन'मध्ये अनेकविध तंत्रज्ञान, साधने किंवा प्लॅटफॉर्मचा समावेश सुसंगम साधण्यास होतो. कुठलाही व्यवसाय ही एक जटिल व टीमवर्कने काम करणारी तसेच विखुरलेल्या स्वरूपात असलेली परिसंस्था म्हणजे इकोसिस्टीम असते. हायपरऑटोमेशन याच परिसंस्थेवर व तिच्या संसाधनांवर पुनरावृत्ती होणाऱ्या प्रक्रिया आणि परंपरागत पायाभूत सुविधांचा भार (लोड) कमी करते व सुलभ साधी सरळ बनविण्याचे निरंतर कार्य करते. हायपरऑटोमेशन परिसंस्थेला परवडणारे किंबहुना झेपणारे परिवर्तन करते व तिला अधिक सुव्यवस्थितपणे वेगवान व कमी खर्चीक कार्य करण्यास सक्षम करते. परिणामी उद्योगधंद्यात कॉम्पिटेटर्सच्या तुलनेत स्पर्धात्मक स्थिती मजबूत होते.

'हायपरऑटोमेशन'च्या सहाय्याने नवनव्या शक्यता व संधी तसेच आगामी धोके व ते टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तसेच कार्यपद्धती व कार्यक्षमतेनुसार कोणत्या कर्मचाऱ्याला नोकरीत किती काळ ठेवायचे व कोणाला ताबडतोब नोकरीतून कार्यमुक्त केले तर एकंदर कंपनीला किती व कसे नफा-नुकसान होईल याची जणू हायपरऑटोमेशन सातत्याने कुंडलीच मांडत दिशादर्शन करते. मॅन्युअल प्रयत्नांना ऑटोमेशनसह बदलण्याच्या दरम्यान योग्य संतुलन राखण्याचे महत्त्व 'हायपरऑटोमेशन' हा दृष्टिकोन अधोरेखित करतो.

**तुमची झोप'!**

जगात एवढं सर्व घडतंय हे मला माहीतच नाही. मला जर आधी कळले असते तर मीदेखील माझा बिझनेस छान चालवीत 'चैन की निंद' घेतली असती हा विचार हायपरऑटोमेशन

## टुडेज् ब्लॉग

**आपल्या देशावर दोनशे वर्ष राज्य केलेल्या ब्रिटनवर आता एका भारतीयाची हुकूमत असणार आहे ही बातमी एकेकाळी साम्राज्यवादाचा शिकार झालेल्या देशांमधील सर्व नागरिकांसाठी सुखावणारी आहे. ऋषी सुनक यांची हुजूर पक्षातर्फे पंतप्रधानपदी झालेली निवड, आपल्या देशाच्या परंपरा आणि गतकाळातला उजाळा देत त्यांनी प्रतीकात्मक पद्धतीने भारताविषयी दाखवलेली आस्था आणि येथील अनिवासी भारतीयांच्या प्रचंड उत्साहाच्या वातावरणात युकेमधील सुनक सरकारचा कारभार सुरू झाला आहे. ब्रिटनचे माजी पंतप्रधान डेव्हिड कॅमेरून यांनी काही वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे इंग्लंडच्या दौऱ्यावर असताना येत्या काळात एखादा भारतीय ब्रिटनच्या पंतप्रधानपदी बसलेला असेल असं भाकीत केलं होतं. अवघ्या काही वर्षातच राजकीय क्षितिजावर ऋषी सुनक यांचा उदय झाला आणि साहेबांच्या देशावर भारतीयांचं वर्चस्व प्रस्थापित होण्याची किमया घडली. ही बाब जगभराच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत अनेक भारतीयांसाठी फारच दिलासादायक आहे.**

सध्याच्या ब्रिटिश संसदेमधील जवळपास १२ टक्क्याहून जास्त लोकप्रतिनिधी हे अश्वेत किंवा इतर वंश गटांमधून निवडलेले आहेत. ब्रिटनच्या इतिहासातील सर्वात वैविध्यपूर्ण संसदेचे नेतृत्व एका भारतीयाकडे चालून येणे ही इतिहासातील अभूतपूर्व घटना आहे. लिबरल पक्षाकडून यापूर्वी निवडले गेलेले भारतीय जसे की दादाभाई नवरोजी, सर मंचर्जी भोनगरी, ब्रिटनच्या कम्युनिस्ट पक्षाकडून पहिल्यांदा खासदार झालेले शापूरजी साकलतवाला ते अगदी अलीकडेच खासदारपदी निवड झालेले मजूर पक्षाचे वीरेंद्र शर्मा अशा अनेक विविध भारतीय नेत्यांची मोठी परंपरा ब्रिटनच्या राजकीय इतिहासाला आहे. मात्र, या सर्व गोष्टींचा काही सकारात्मक परिणाम भारतीय त्यांच्या आकांक्षा आणि अर्थव्यवस्थेवर होणार की या गोष्टी फक्त प्रतीकात्मक पातळीवर राहणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

एकीकडे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना इकडे ब्रिटन मात्र कधी नव्हे एवढ्या आर्थिक आणि राजकीय संकटांमध्ये सापडला आहे. एकेकाळी ज्या साम्राज्यावरील सूर्य ढळत नव्हता, त्या देशामध्ये चलनवाढ, बेरोजगारी आणि नागरिकांच्या जीवनमानाचे मूलभूत प्रश्न उभे ठाकले आहेत.

# दुहेरी आव्हान



अशा परिस्थितीत एका भारतीय वंशाच्या व्यक्तींना पंतप्रधानपदी येणे या दोन्ही देशांसाठी नव्या शक्यता निर्माण करणार आहे. ब्रिटनने युरोपीय युनियनमधून माघार घेतल्यानंतर अर्थव्यवस्थेमध्ये आलेली मरगळ दीर्घकाळ टिकली. या दरम्यानच्या काळात ब्रिटनमध्ये परकीय चलनाचा ओघ आला मात्र, दुसऱ्या बाजूला दैनंदिन जीवनाच्या खर्चात झालेली वाढ ही राजकीय संकट घेऊन येणारी ठरली. सुदैवाने या घटनेनंतर भारताशी ब्रिटनचा असणारा व्यापार दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेला. गेल्या दोन वर्षात भारतातून ब्रिटनमध्ये होणारी निर्यात तब्बल २८ टक्क्यांनी वाढली. सध्या ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेमध्ये मोठा वाटा असणाऱ्या येथील विद्यापीठांमध्ये येणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचा ओघ कधी नव्हे इतका प्रचंड वाढला आहे. दोन देशांच्या दरम्यान मुक्त व्यापार करारासाठी झालेल्या चर्चेच्या पाच फेऱ्यानंतर व्यापार उद्दीन एका नव्या वळणावर जाऊन वृद्धिंगत होण्याची शक्यता आहे. या कराराकडून भारतीय व्यापारी तसेच विद्यार्थी वर्गाला प्रचंड अपेक्षा आहेत. सुनक यांनी पंतप्रधान मोदी यांच्याशी फोनवर बोलताना आपण भारत व ब्रिटन यांच्या परस्पर नात्यांचे 'दृश्य प्रतिनिधी' असल्याचे सांगितले आहे. हा करार यशस्वी ठरल्यास या दोन्ही देशांच्या मैत्रीमध्ये एका नव्या पर्वाला सुरुवात होईल व सामरिकदृष्ट्या तो भारतासाठी मोठा विजय असेल अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, त्याच वेळी या दृश्य परिणामांच्या पलीकडे व्यावहारिक अर्थाने भारतीयांपुढे व एकूणच अनिवासी लोकसंख्येपुढे काही पेच उभे राहणार आहेत.

सध्या युकेमध्ये सुरू असणारी चलनवाढ आणि कंबरतोड महागाई हे सुनक यांच्यापुढील मोठं आव्हान असेल. चार महिन्यांत तीन पंतप्रधान पाहावे लागण्याचे प्रमुख कारण म्हणजे वाढती महागाई, वीज व ऊर्जा बिलांच्या दरावर ठेवता न आलेले नियंत्रण. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर आलेल्या ऊर्जा तुटवड्यामुळे येत्या काळात येथील वीजबिले दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. या मुद्द्यावरून समाजाच्या सर्वच थरांत घबराट व नाराजी आहे. ब्रिटनमधील बेघर लोकांची संख्या कधी नव्हे इतकी वाढलेली आहे. सध्याच्या परिस्थितीचं वर्णन 'जगण्याची किंमत चुकवण्यासाठीचा संघर्ष' असे केले जाते आहे.

**- वैभव वाळुंज.**

## बोधकथा — बळी तो कान पिळी



एकदा प्राण्यांमध्ये रोगाची साथ सुरू होऊन हजारो प्राणी मरू लागले. आपण फार पाप केल्यामुळे देवाने हा कोप केला आहे असे सर्व प्राण्यांना वाटून त्यांनी आपली वाईट कृत्ये कबूल करायचे ठरविले व जो सर्वात मोठा अपराधी ठरेल त्याने देवाच्या कोपाला शांत करण्यासाठी बळी जावे असे ठरले. ठरल्या वेळी सगळेजण हजर झाले व न्यायाधीशाच्या जागी एकमताने कोल्ह्याची निवड केली गेली. प्रथम सिंहाने पुढे होऊन कबुली दिली, मी फार गरीब कोकरांना ठार मारलं, एवढंच नव्हे तर फार भूक लागल्याने एका धनगरालाही ठार मारून खाल्लं.' त्यावर न्यायाधीश म्हाराज मोठ्या गंभीरतेने म्हणाले, एखाद्या सामान्य प्राण्याने अशा गोष्टी केल्या असत्या तर नक्कीच मोठा अपराध ठरला असता. पण महाराजांना इतरांपेक्षा जास्त सवलती असतात. मूर्ख बकऱ्या नि एकच धनगर खाणं हा काही मोठा अपराध नाही.' या निकालामुळे हिंस्त्र प्राण्यांनी कोल्ह्याची तारीफ केली. यानंतर वाघ, चित्ता, अस्वल वगैरे प्राण्यांनी आपापल्या कबूली दिल्या व कोल्ह्याने वरीलप्रमाणेच निकाल दिला. शेवटी एक गरीब गाढव पुढे येऊन म्हणाले, 'एका शेतकऱ्याच्या इनाम जमिनीतलं मूठभर हिरवं गवत मी खाल्लं आणि त्याबद्दल मला 'पश्चात्ताप' काय 'पश्चात्ताप?' न्यायाधीश झालेले कोल्होबा ओरडले. अरे पाप्या नक्कीच तुझ्या पापामुळे सध्या हा देवाचा कोप झालेला आहे. यालाच मरणाची शिक्षा योग्य आहे!' असा निकाल कोल्होबांनी देताच सगळ्यांनी मिळून त्या बिचाऱ्या गाढवाला ठार मारले.

**तात्पर्य - बळी तो कान पिळी.**

## जन्म हा अखेरचा — धर्माचारस्थल - २




गौतम बुद्धांनी त्याला विचारले, ''जर तुला कोणाला प्राण देता येत नसतील तर प्राण घेण्याचा अधिकार तुला कोणी दिला?'' गौतम बुद्धांच्या प्रश्नाने अंगुलीमालाला आपल्या हातून अधर्म घडतो आहे याची स्पष्ट जाणीव झाली आणि हिंसावृत्तींचा त्याग करुन तो गौतम बुद्धांचा अनुयायी झाला.

हिंसक मनुष्यदेखील अहिंसेचा पूर्ण बोध झाला तर संपूर्ण अहिंसक होऊ शकतो, हेच सत्य अंगुलीमालाची कथा सांगतो. जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे, म्हणून सर्वांना जगू द्यावे आणि सर्वांसोबत आपणही जगावे. सगळ्यांबरोबर सौहार्दभावाने वर्तन करणे हेच अहिंसेचे मुख्य वर्म होय.

**सत्येन धार्यते पृथ्वी: सत्येन तपते रवि: । सत्येन वायवो वान्ति सर्व सत्ये प्रतिष्ठीतम् ।।** शेषाने आपल्या मस्तकावर पृथ्वी धारण केली असे आपली पुराणे सांगतात. शेष म्हणजे काय? सर्वात शेवटी जे 'शेष' राहते त्यालाच 'सत्य' म्हणतात. मनुष्य मेल्यावर आपण 'राम राम सत् है म्हणतो. सारे काही संपल्यावर शेवटी जे उरते ते सत्य असते, या अर्थाने सत्याने पृथ्वी धारण केली आहे आणि सत्यामुळेच सर्वांना प्रतिष्ठा लाभली आहे. सत्यामुळेच सारे काही टिकून राहिले आहे.' **सत्य मूलानि धर्माणि सत्यान्नास्ति परंतप: । सत्येन लोकां जयति सत्ये सर्व प्रतिष्ठीतम् ।।**

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## पुस्तकांचा कोपरा



महात्मा गांधींनी पुस्तकांना माणसाचा सर्वात चांगला मित्र म्हटले आहे, तेव्हा त्याला आजही एक खोल अर्थ आहे. मात्र, आज जसे आपण आधुनिक झालो आहोत तसे तंत्रज्ञानाचे गुलाम होत चाललो आहोत. त्यामुळे आपले पुस्तकांपासूनचे अंतर सातत्याने वाढत चालले आहे. शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देण्याची व्याप्ती वाढली आहे, प्रत्यक्षात पुस्तकांचा आधार असलेल्या शिक्षणापासून विद्यार्थ्यांचे वाढते अंतर हे शिक्षणतज्ज्ञांच्या चिंतेचे कारण ठरत आहे. काळानुरूप शैक्षणिक धोरणे आणि अभ्यासक्रम बदलले आहेत, तरीही विद्यार्थी पुस्तकांशिवाय इतर मार्ग शोधत आहेत. उदाहरणार्थ, नोट्स, पासबुक आणि 'वनवीक' सारख्या मालिका इत्यादींच्या मदतीने शिक्षणाची नौका पार केली जात आहे. जर विद्यार्थी पुस्तकांशिवाय उच्च शिक्षण घेत असतील तर ते किती शिकत आहेत किंवा किती ज्ञान मिळवत आहेत? आणि कसल्याप्रकारचे नागरिक बनत आहेत, हा मोठा चिंतेचा विषय आहे. सत्य हे आहे की वाचकांना किंवा विद्यार्थ्यांना सल्ले, व्याख्याने देऊनही ते पुस्तकाभिमुख होताना दिसत नाहीत, कारण वातावरण दिवसेंदिवस पुस्तकविरोधी होत चालले आहे. टीव्हीनंतर आता स्मार्टफोन आणि डेटाचा वापर सहजसुलभ झाल्याने सर्व काही ऑनलाइन झाले आहे. ग्राहकांना यापुढे बाजारात जाण्याची गरज राहिलेली नाही तसे मुलांनाही शाळेत जाण्याची गरज भासेनाशी झाली आहे. कोरोना काळाने कर्मचाऱ्यांना कार्यालयात जाण्याची गरज नसल्याचे दाखवून दिले आहे. 'वर्क फ्रॉम होम' किंवा ऑनलाइन टू वर्क, घरून मीटिंग आणि सर्व प्रकारचे शिक्षण व्हिडिओच्या माध्यमातून घरी बसून केले जात आहे. विद्यार्थी आता ऑनलाईन परीक्षेसाठी जोर देत आहेत. यासाठी आंदोलने झाली आहेत. तासही ऑनलाईन व्हावेत, यासाठी मागणी करत आहेत. अशा परिस्थितीत पुस्तक वाचायला कोण बसेल? फक्त डिग्री मिळायची एवढाच उद्देश आता राहिला आहे.

अशा वेळी पुस्तके कोण वाचत आहेत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. माहितीचा साठा स्मार्टफोन किंवा लॅपटॉपवर उपलब्ध असताना आणि प्रत्येक माहिती देण्यासाठी पाने न उघडता 'गुगल बाबा' सज्ज असताना, मग विद्यार्थ्यांनी पुस्तकासाठी शाळा- कॉलेज किंवा ग्रंथालयात का पोहोचावे? पुस्तकांसाठी अनेक पर्याय उपलब्ध असताना ही मंडळी ग्रंथालयांची पायरी का चढतील अथवा पुस्तकांचे कप्पे का धुंडाळत बसतील? युट्युबवर प्रत्येक विषयाचे ऑडिओ-व्हिडिओ आणि प्रत्येक शहरात कोचिंगचे जाळे विणले जात असताना, ग्रंथालये केवळ शोभेच्या वास्तू तर राहणार नाहीत ना? वेळ ही अशी आहे की, तिला कोणत्याही परिस्थितीत मागे वळता येत नाही. हे खरे की, माणसाचा वेग खूप वाढला आहे. कोणाकडेही मोकळा वेळ नाही किंवा कमीत कमी वेळेत आणि कोणत्याही परिस्थितीत यश मिळवायचे आहे. आता लांब आणि सुरक्षित चालण्याचा विचार पूर्णपणे नाहीसा झाला आहे. संयमाचा, समाधानाचा पूर्ण अभाव निर्माण झाला आहे, अशा परिस्थितीत सर्वांना शांतता हवी असते, पण आता ती नाही मिळत, ती फक्त थडग्यातच शक्य होईल, कारण प्रत्येकजण 'उद्या शांतता हवी आहे' म्हणून धावाधाव करत आहे. आज प्रत्येकजण सर्व काही साध्य करण्याच्या, अधिक पैसे मिळविण्याच्या शर्यतीत आहे. अशा परिस्थितीत पुस्तकांचे वाचक होण्याऐवजी ते सतत ऑडिओ-व्हिडिओच्या गर्तेत अडकून राहिले आहेत.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत.**

## जनमानस

## विठूचरणी प्रार्थना!!

कार्तिकी एकादशी! पंढरपूर यात्रा! संतांचे अभंग भजने गात दिंड्या पंढरीत येतात आणि भक्तगण विठु माऊलीच्या दर्शनाने धन्य होतात. यावर्षी आर्थिक मंदी, अतिपावसाने ओला दुष्काळ त्यामुळे पिकपाण्याची नासाडी असे बिकट प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी बळ द्यावे परिस्थितीत चांगले बदल व्हावेत हीच विठूचरणी प्रार्थना!!

**- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

## सामान्यांचा 'वडापाव' महागणार !

पेट्रोल, डिझेल, गॅसच्या किमती अगोदरच वाढल्या आहेत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तू जसे भाजीपाला, धान्ये यांच्या किमती वाढत चाललेल्या आहेत. गहू, तांदूळ तर महाग झालेलाच आहे. वाहतुकीचे दर वाढलेले आहेत. एकूणच सवर्च स्तरावर महागाई वाढत चाललेली दिसत आहे. यात भरच म्हणून की काय... आता ब्रेड व पावाच्या किमती सुद्धा वाढल्या आहेत. त्यामुळे सामन्याचा तारणहार वडा पाव सुद्धा महागाईच्या सीमारेषेवर आहे, अशी बातमी नुकतीच वाचली मुंबई, पुणे, नाशिक येथे सर्वसाधारणपणे १० ते १५ रुपयांना वडा पाव मिळतो



पावाच्या दरात ५० पैशांनी वाढ झाली आहे. या वर्षातील ही तिसरी वाढ आहे. पावासोबत ब्रेडच्या किमती सुद्धा वाढणार आहेत. वडा पावासोबत कचोरी तसेच भजीसुध्दा महागणार आहेत. एक अंदाजानुसार तीन ते चार रुपयांनी वडा पावाच्या किमती वाढणार असे दिसू लागले आहे. त्यामुळे जवळपास वडा पाव आता २० रुपये एवढा भाव खाईल. वडा पाव मुंबईत तसेच पुण्यात अतिशय लोकप्रिय आहे. मुंबई शहरात तर प्रत्येक व्यक्ती नोकरी व धंद्यासाठी धावपळ करत असते. त्यामुळे घरून डबा न आणता एक किंवा दोन वडा पाव खाल्ले की बस्स...! मुंबईच्या धावत्या जीवनाला वडा पावचा मोठा आधारच आहे. आता वडा पाव महागला की मुंबईकरांना मोठा आर्थिक फटका बसेल. तसेच याची झळ मुंबई बरोबरच पुणे, नाशिक, औरंगाबाद येथील सुद्धा कर्मचाऱ्यांना बसेल यात शंका नाही.

**- शांताराम वाघ, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड





अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार दि. ५ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ३९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# आषाढीला भाविकांना पंढरीत बदल दिसेल

## ▸ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विश्वास
## ▸ कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

सुराज्य/सोलापूर

**गोरगरीब जनता, कष्टकरी व शेतकऱ्यांवर येणारी संकटे दूर होऊन तो सुजलाम सुफलाम व्हावा, यासाठी शक्ती आणि आशीर्वाद द्यावा असे साकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित शासकीय महापुजेच्याप्रसंगी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले. मंदिराच्या दुरुस्तीचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येईल आणि आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री आणि भाविक पंढरीत येतील तेव्हा त्यांना हा बदल दिसेल, असा विश्वास व्यक्त केला.**



**साळुंखे दांपत्य ठरले मानाचे वारकरी**

शिरोडी खुर्द (ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद) येथील उत्तमराव साळुंखे आणि कलावती साळुंखे हे दांपत्य मानाचे वारकरी ठरले. त्यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमृता फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने एक वर्ष कालावधीचा मोफत प्रवासाचा पास सुपूर्द करण्यात आला. साळुंखे समाज कल्याण कार्यालयातून सेवानिवृत्त झाले असून ते पन्नास वर्षापासून वारी करत आहेत.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीची कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस व सौ. अमृता फडणवीस यांच्या हस्ते पार पडली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते त्या दोघांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

यावेळी महसूलमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, आमदार सर्वश्री हरिभाऊ बागडे, बबनराव पाचपुते, सुभाष देशमुख, रणजितसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, पृथ्वीराज देशमुख, सुनील कांबळे, गोपीचंद पडळकर, राणा जगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोजकुमार लोहिया, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी संजीव जाधव, मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते.

अनेक आक्रमणे होत असतानाही वारकऱ्यांनी भागवत धर्माची पताका फडकवत ठेवली. वारीचा हा अभूतपूर्व सोहळा पाहणाऱ्याच्या डोळ्यांचे पारणे फिटते. हा सोहळा वृद्धिंगत व्हावा, अशी आपणा सर्वांची अपेक्षा आहे, असे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, पंढरपूर वारीच्या सर्व परंपरा अखंडित ठेऊन वारकरी संप्रदायाची परंपरा पाळून, स्थानिकांना विश्वासात घेऊन, कोणाचेही नुकसान न करता, कोणालाही विस्थापित न करता, अधिग्रहीत केलेल्या जागेचा योग्य मोबदला संबंधितांना देऊन, पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतिम करण्यात येईल.

नामदेव पायरी ही एक अभूतपूर्व व्यवस्था आहे. त्याचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक येतात. त्यामुळे मंदिर जीर्णोद्धार व नामदेव पायरीचा विकास प्राधान्याने करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिल्याचे त्यांनी सांगितले. पांडुरंगाच्या भक्तीत लीन होऊ या व भागवत धर्माची परंपरा, वारकरी प्रथा - परंपरा, भक्तिभाव पुढच्या अनेक पिढ्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करूया, असे ते म्हणाले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत व लोकप्रतिनिधी व प्रमुख वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. मंदिर समिती सदस्या ह. माधवी निगडे यांच्या वेलफेअर फाऊंडेशनच्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथेवर आधारित निमेटेड फिल्मचे तसेच मंदिर समिती दैनंदिनी व श्रींच्या पुरातन अलंकारांच्या अल्बमचे प्रकाशन उपमुख्यमंत्र्यांच्याहस्ते यावेळी करण्यात आले. यावेळी बालवारकऱ्यांकडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर महाराज यांनी केले. तर आभार विनया कुलकर्णी यांनी मानले. श्री संत नामदेव महाराज वाड्याला भेट आणि दर्शन संत नामदेव महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सौ. अमृता फडणवीस यांनी श्री संत नामदेव महाराज वाड्यात जाऊन दर्शन घेतले. मंदिर समितीच्यावतीने यावेळी त्यांचा पगडी व शाल देऊन तर सौ.अमृता फडणवीस यांचा साडी देऊन सत्कार करण्यात आला.

# खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीस दहा वर्षे सक्तमजुरी

सुराज्य/सोलापूर

भावजयीवर ब्लेडने गळ्यावर गंभीर जखम करून खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी बाळू लक्ष्मीपती भंडारी (वय-३०,रा.नीलम नगर राघवेंद्र नगर जवळ, सोलापूर) या आरोपीस प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.ए.ए.आर,औटी यांनी दहा वर्षाची सक्त मजुरी व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा टोटावली.

शोभा नरेश भंडारी (वय-३५,रा. विडी घरकुल) ही विडी कामगार असून ती तिचा नवरा व मुलासंह वरील पत्त्यावर रहाते.आरोपी बाळु भंडारी हा तिचा दिर असून तो त्यांच्याकडे येत-जात असे. त्यावेळी आरोपीचे कुठल्यातरी मुलीशी संबंध होते.त्यास फिर्यादी व घरातील सर्वजण आरोपीस समजावून सांगत होते की,आपण तुला आपल्या जातीतील मुलगी करुन देवू.त्यावेळी आरोपी त्याच मुलीशी लग्न करावयाचे म्हणून फिर्यादी व घरातील सर्वांना भांडत होता.फिर्यादी ही घरात बसलेली असताना व फिर्यादीचा नवरा कामानिमीत्त बाहेर गेलेला असताना आरोपी हा घरी आला.तुम्ही मला माझ्या आवडत्या मुलीशी लग्न का करु देत नाही,तुम्हाला मी दाखवतो असे म्हणू लागला.त्यावेळेस फिर्यादीस तुझ्यामुळेच सगळे होत आहे,मी तुला



सोडणार नाही,असे म्हणून त्याने त्याचे जवळील ब्लेडने फिर्यादी बसल्या ठिकाणी पाठीमागून येवून ब्लेडने गळ्यावर जोरात वार केला,त्यात ती जखमी झाली होती. वसंसग पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला होता. यात सरकारपक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी आरोपी ज्याच्या कडून त्याच दिवशी ब्लेड विकत घेतले होते.तो दुकानदार,फिर्यादी व इतर साक्षीदार यांची साक्ष महत्वाची ठरली.या प्रकरणात सरकारपक्षाच्या वतीने अति सरकारी वकील ॲड.एन.बी. गुंडे व ॲड.माधुरी देशपांडे,अति.सरकारी वकील सोलापूर यांनी काम पाहिले. तर आरोपीच्या वतीने ॲड एम.एस.कुरापती यांनी काम पाहिले.कोर्ट पैरवी म्हणून शितल साळवी यांनी काम पाहीले.

# टँकर घोटाळाप्रक रणी मनपाच्या सर्व झोनची होणार तपासणी

**सोलापूर** : पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरमध्ये घोटाळा झाल्याचा प्रकार झोन क्रमांक दोन मध्ये उघडकिस आला होता. याप्रकरणी गुन्हा देखील झाला होता. यानंतर मनपा आयुक्तांनी उर्वरित सात झोनची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

तीन ते चार वर्षापूर्वी शहरामध्ये टँकरने पाणीपुरवठा केला होता. याबाबत बिलामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्यानंतर याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मनपा आयुक्तांनी दिले होते. यानंतर यामध्ये दोषी आढळल्यानंतर तत्कालीन झोन अधिकाऱ्यांसह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच या प्रकरणची खातेनिहाय चौकशी देखील करण्यात आली होती. जवळपास ९० लाखाचा घोटाळा यावेळी उघडकिस आला होता. यानंतर आता उर्वरित सात झोनमधील टँकरने करण्यात आलेल्या पाणीपुरवठयाची चौकशी होणार आहे. यामुळे बडे अधिकारी मध्ये सापडणार असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# किरण लोहार लाचप्रकरणी आज होणार सुनावणी

सुराज्य/सोलापूर

लाचखोर प्रकरणी शिक्षणाधिकारी आरोपी किरण लोहार यांची शनिवारी सोलापूर न्यायालयात सुनावणी होणार असून,सरकार पक्षाने म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितला आहे.

किरण लोहार लाचप्रकरणी सरकार पक्षाने जामीन अर्जाबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सरकारी वकिल ॲड.गंगाधर रामपुरे यांच्या माध्यमातून सोलापूर न्यायालयात मुदत मागितल्याने न्यायालयाने यावर



सरकार पक्षाला शनिवारपर्यंत म्हणजेच एक दिवसाची मुदत दिली आहे.

याबाबत न्यायालयात सुनावणी होणार असल्याची माहिती आरोपीचे वकिल ॲड. मिलिंद थोबडे यांनी दिली. याप्रकरणी सरकारतर्फे गंगाधर रामपुरे आणि आरोपीच्या वतीने ॲड.मिलिंद थोबडे, ॲड.विनोद सूर्यवंशी हे काम पाहत आहे.

# कंबर तलावाजवळील महामार्ग मनपा घेणार ताब्यात

सुराज्य/सोलापूर

शहरातून जाणारे महामार्ग महापालिकेकडे हस्तांतरण करण्याच्या विषयाला चालना मिळणार आहे. महामार्ग विभाग कंबर तलावाजवळील महामार्ग दुरूस्त करून मनपाच्या ताब्यात घेणार आहे, अशी माहिती मनपा आयुक्त पी.शिवशंकर यांनी दिली.

शहरातील मनपाच्या मालकीच्या रस्त्यांबरोबर महामार्ग विभागाच्या अनेक रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. शहरातून जाणाऱ्या ज्या महामार्गांसाठी बायबास रस्त्याची सोय आहे असे रस्ते संबंधित मनपाने हस्तांतरित घ्यावे असा शासन निर्णय आहे, मात्र आर्थिक स्थिती बिकट असल्याने सोलापूर असे महामार्ग ताब्यात घेण्यास महापालिका राजी नव्हती., पण आता असे महामार्ग मनपा ताब्यात घेणार असे दिसते. मनपा आयुक्तांनी काही महिन्यांपूर्वी महामार्ग विभागाला पत्र



देऊन शहरातील खराब महामार्ग दुरूस्त करून दिल्यास ते ताब्यात घेऊ अशी भूमिका मांडली होती. या मागणीस महामार्ग विभागाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. कंबर तलावाजवळून जाणारा महामार्ग दुरूस्त करून देण्याची तयारी महामार्ग विभागाने दर्शविली आहे. त्यामुळे हा रस्ता दुरूस्त झाल्यावर तो मनपाकडे हस्तांतरित करून घेणार, असे आयुक्तांनी शुक्रवारी पत्रकारांना सांगितले.

# फडणवीसांच्या पंढरी दौऱ्याकडे आ.विजयकुमार देशमुख यांनी फिरवली पाठ

**सोलापूर** : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर कार्तिक एकादशीच्या पूजेच्या निमित्ताने पंढरपूर दौऱ्यावर आले असता,माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुखांची पंढरपूर दौऱ्यातील गैरहजेरी दिवसभर चर्चेचा विषय ठरली.



देवेंद्र फडणवीसांच्या दौऱ्यात पूजेनंतर आमदार समाधान अवताडे व माजी आमदार परिचारक यांच्या कार्यक्रमास देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली यावेळी जिल्ह्यातील सर्व आमदार व खासदार उपस्थित असताना,माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या अनुपस्तिथी मुळे राजकिय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू होती. नुकतेच नूतन पालकमंत्री विखे पाटील यांच्या सोलापूर दौऱ्यात देखील आमदार विजयकुमार देशमुख यांनी गैरहजेरी लावल्याने,ते नाराज आहेत का?अशी चर्चा सुरू होती व आतातर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्याकडे त्यांनी पाठ फिरवल्याने,पुन्हा तीच चर्चा सुरू झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लै शिकला त्यो!!

कल्याण
235-05-168

मेन बाजार
267-59-289

# बहरलेल्या फांदीत रंगकर्मींना मिळतेय सुखाची सावली

**सोलापूर** : आज मराठी रंगभूमी दिन. नाट्य क्षेत्र गाजवलेल्या आणि सध्या गाजवत असलेल्या रंगकर्मींचा या दिवशी सन्मान राखला जातो. समाजाकडून त्यांचा गौरवही केला जातो. सोलापूर हे एकेकाळी जसे कामगारांचे शहर होते, तसे ते कलावंतांचेही होते. अगदी स्वातंत्र्यापासून ते आजतायागत संगीत क्षेत्रातील असतील किंवा नाट्य विश्वातील. अशा प्रत्येक कलावंतांनी सोलापूरच्या सांस्कृतिक क्षेत्राला नुसती झळाली दिली नाही तर आपल्या वैभवसंपन्न कलाकृतीतून प्रतिष्ठाही मिळवून दिली आहे. मनोरंजन विश्वात रूजलेल्या बीजाची एक फांदी म्हणजे मराठी नाटक. ही फांदी अशी बहरली आहे की -त्याच्या सावलीखाली आजचे कलावंत सुखाचे चार घास खात आहेत,हीच एक समाधानाची बाब सांगता येईल.



प्रकाशात उजळलेला भला मोठा रंगमंच.. लाल मखमली पडदा.. म्युझिकचा मंद स्वर, नेपथ्याची लगबग.. तिसरी घंटा.. आणि तुमची परीक्षा घेण्यासाठी समोर बसलेले प्रेक्षक, हे वातावरण डोळ्यासमोर येताच कोणत्याही रंगकर्मींच्या अंगावर काटा आल्यावाचून राहणार नाही. मागील कित्येक वर्षांपासून मनोरंजन आणि प्रबोधन यांची सांगड घालत नाटक संस्कृतीचा वारसा मनोरंजन विश्वात रुजत आहे. या रुजलेल्या बीजाची एक फांदी म्हणजे मराठी नाटक. १८४३ साली सीता स्वयंवर या नाटकाच्या रूपात सुरु झालेला हा प्रवास अलीकडच्या संगीत देवबाभळी, अनन्या, अलबत्त्या गलबत्त्यापर्यंत दिवसागणिक आणखीनच प्रगल्भ होत चालला आहे. मराठी रंगभूमीच्या सेवेत रुजू असणाऱ्या प्रत्येक रंगकर्मीसाठी ५ नोव्हेंबर हा दिवस अतिशय महत्वाचा असतो. कारण या दिवशी मराठी रंगभूमी दिन साजरा केला जातो.


दरम्यान, मागील काही काळात रंगभूमीवर पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मनोरंजनपर, रहस्यमय असे वेगवेगळे विषय हाताळले जाऊ लागले आहेत. काही बड्या कंपन्यांच्या पुढाकाराने अनेक नवीन मराठी नाटके तसेच जुन्या नाटकाचे रिमेक गाजत आहेत.१७० वर्षाची ही मराठी नाटकाची परंपरा येत्या काळात आणखीनच वृद्धिंगत होत राहो ही सदिच्छा आणि रंगकर्मींना मराठी रंगभूमी दिनाच्या शुभेच्छा देता येतील.

**मानाचे गौरव पदक... :** मराठी रंगभूमीवरील सर्वात मानाचा असा यंदाचा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार जेष्ठ नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, लेखक सतीश आळेकर यांना जाहीर झाला आहे. २५ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ असे गौरवपदक पुरस्काराचे स्वरुप आहे. रंगभूमीदिनाचे औचित्य साधून जेष्ठ दिग्दर्शक, रंगकर्मी डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण होणार आहे.विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार हा मराठी रंगभूमीवरील मानाचा समजला जाणारा पुरस्कार असून नाट्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्यांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. यंदा दिले जाणारे हे ५५ वे गौरव पदक आहे. विष्णूदास भावे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सांगलीची अखिल भारतीय नाट्य विद्यामंदिर समिती ही १९६० सालापासून विष्णूदास भावे पुरस्कार देत आली आहे. सांगली येथील ही समिती व राज्य मराठी नाटय परिषद यांच्यातर्फे दरवर्षी ' रंगभूमिदिना' दिवशी हे मानाचे पदक दिले जाते.

**असा झाला पर्वाचा प्रारंभ :** १८४३ मध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीचा पाया रचला गेला. चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयात विष्णुदास भावे यांनी ५ नोव्हेंबर १८४३ साली सीता स्वयंवर या नाटकाचा प्रयोग केला आणि तिथूनच मराठी नाटकांच्या पर्वाला सुरुवात झाली. १९४३ साली या दिवसाच्या स्मरणार्थ म्हणून या क्षेत्रातील सर्व नामवंत कलाकारांनी एकत्र येऊन सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा केला. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापन करण्यात आली. यावेळी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून घोषित करण्यात आला.

# राऊत यांना विकास निधीसाठी सदैव सहकार्य : फडणवीस

## फडणवीस यांच्या हस्ते बार्शीत विविध विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण





पहिल्या छायाचित्रात बार्शी येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी आ. राजेंद्र राऊत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आ. प्रशांत परिचारक, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, चेअरमन रणवीर राऊत, आ. सचिन कल्याणशेट्टी, राणाजगजिसिंह पाटील, आ. राम सातपुते आदी तर दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित जनसमुदाय.

✔ सुराज्य/बार्शी

**बार्शीच्या मतदारांनी आमदार राजाभाऊ राऊत यांना मतांचे सत्पात्रीदान देत समर्थ लोकप्रतिनिधी निवडून दिला असून त्यांना तालुक्याच्या सर्व विकास प्रकल्पांसाठी निधीबाबत कायम सहकार्य राहील, असे अभिवचन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील गांधी चौकात हजारो बार्शीकरांच्या उपस्थितीमध्ये दिले. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार रणजीतसिंह नाईक- निंबाळकर, माजी मंत्री सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राम सातपुते, आमदार सुरेश धस, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार राजाभाऊ राऊत, माजी आमदार प्रशांत परिचारक, बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत, नगरसेवक विजय राऊत आदी उपस्थित होते.**

यावेळी फडणवीस म्हणाले, 'आमदार राऊत यांनी शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या मागण्या मांडल्या. त्यांना आजपर्यंत कधीही विकासनिधी कमी पडू दिला नाही. त्यांना उपसा सिंचन योजनेसाठी ७०० कोटी रूपये निधी मंजूर केला आहे. त्यापैकी ३५० कोटी रूपये तातडीने देत आहोत. लवकरच या कामाच्या निविदा निघतील.

आमदार राऊत यांनी तालुक्यातील आठ मंडळातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मागितलेला ८० कोटी रूपयांचा निधी तात्काळ मंजूर केला. त्यांना तालुक्याच्या विकासाबाबत सतत पाठबळ देऊ. कारण बार्शी हे मराठवाड्याचे प्रवेशद्वार असून या शहरात परिसरातील इतर तालुक्यातील जनताही धार्मिक, शैक्षणिक, आरोग्य व व्यापारासाठी कायम येते. बाजारपेठ व व्यापारपेठ भरभराटीला येण्यासाठी आमदार राऊत यांनी केलेल्या प्रयत्नांना कायम साथ देऊ. शहरातील भुयारी गटार योजना चांगले काम करून अल्पावधीत पूर्ण केल्याबद्दल फडणवीस यांनी यावेळी आमदार राऊत यांच्या कार्यपद्धतीबद्दल गौरवोद्‌गार काढले. शेतकऱ्यांना १२ तास वीज देण्याचा शासनाचा मानस आहे, असे सांगत फडणवीस यांनी सौर फिडर कार्यान्वित करणार आहोत. शेतकऱ्यांना ३ हेक्टरपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा निर्णय संवेदनशीलतेने घेतला आहे.

आमदार राऊत यांच्या सार्वजनिक रस्त्यांबाबतच्या निधी मागणीविषयी फडणवीस यांनी माजी व विद्यमान बांधकाम मंत्री आमदार राऊत यांचे मित्र आहेत. त्यामुळे त्यांचे निधीबाबत अडणार नाही, असे सांगितले.

यावेळी प्रास्ताविकात आमदार राऊत म्हणाले, 'बार्शी-कुर्डूवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या जलवाहिन्या सारख्या फुटतात, त्यामुळे समांतर पाणी पुरवठा योजना अंमलात आणणे गरजेचे आहे. तालुका उपसा सिंचन योजना पूर्णत्वाला गेल्यानंतर तालुक्यातील १२,५५० हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. त्यामुळे ही योजनेची पूर्तता होणे गरजेचे आहे. यापूर्वी साठवण तलाव बंधारे यासाठी फडणवीस यांनी मोठा निधी दिला. बार्शी-उस्मानाबाद रस्ता, बार्शी-सोलापूर रस्ता फडणवीस यांच्या निधी मंजुरीमुळेच झाला. आता माढा-उस्मानाबाद, बार्शी-तुळजापूरसाठी निधीची गरज आहे. फडणवीस यांनी बार्शीबरोबरच जिल्ह्याच्याही पाणी प्रश्नासाठी सहकार्य करावे, कायम शेतकरी व समाजाच्या विकासासाठीच निधीची मागणी केली असून अतिशय चांगल्या पद्धतीने उत्कृष्ट कामे करू, असे वचन यावेळी आमदार राऊत यांनी दिले. फडणवीस यांच्या हस्ते शहरातील भुयारी गटार योजना या ११२ कोटी रूपयांच्या कामाचा लोकार्पण सोहळा तसेच १३ रस्त्यांसाठी ८९ कोटी रूपये निधीच्या विकास कामांचा तसेच १५९६ घरांच्या नियोजित वसाहतीच्या ऑनलाईन शुभारंभ झाला. तसेच फडणवीस यांच्या हस्ते बार्शी-तुळजापूर रस्त्यावरील उद्योगपती दिलीप व शितल गांधी यांच्या सोयाबिन प्रक्रिया उद्योगाचा शुभारंभ झाला. त्यांनतर फडणवीस यांनी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल अंतर्गत ट्रॉमा युनिटला सदिच्छा भेट दिली व निधीचे अभिवचन दिले. फडणवीस यांनी शहरातील दैवत श्री भगवंत मंदिरात दर्शन घेतले.

फडणवीस यांनी आपल्या भाषणामध्येही कार्तिकी एकादशीच्या दिवशी पांडुरंगाच्या चरणी लीन होऊन भगवंताच्या पायावर माथा ठेवण्याचे भाग्य लाभले. ही गेल्या जन्मीची पुण्याई आहे, असा उल्लेख केला. तसेच आमदार राऊत यांनीही श्री विठ्ठल व भगवंताच्या दर्शनाचा दुग्धशर्करा योग लाभल्याचे आपल्या भाषणात सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, बाजार समितीचे संचालक रावसाहेब मनगिरे यांच्यासह जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका सदस्य यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे निता देव यांनी सूत्रसंचालन केले.

---

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी वारकरी संप्रदायांनी प्रबोधन करावे : कृषिमंत्री

✔ सुराज्य/पंढरपूर

**वारकरी संप्रदायाने गावोगावी होणाऱ्या भजन कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधनाद्वारे समाजाला जागृत करण्याचे काम केले. यामुळे समाजातील अनेकांचे संसार सुखी झाले आहेत. याच माध्यमातून शेतकऱ्यांचेही प्रबोधन केले तर शेतकरी कधीही आत्महत्या करणार नाही. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी शुक्रवारी येथे दिली.**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत वारकरी संप्रदायातील वारकरी व फडकरी समवेत आयोजित प्रबोधनपर बैठकीत ते बोलत होते. संत तुकाराम भवन येथे आयोजित या बैठकीस आमदार डॉ. बालाजी किणीकर, बापूसाहेब देहुकर, गणेश महाराज शिंदे, विठ्ठल पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, उपविभागीय कृषि अधिकारी



आर. एन. कांबळे, सर्जेराव तळेकर यांच्यासह वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषिमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, वारकरी, फडकरी यांच्या प्रत्येक शब्दाला समाजात मान असून, समाजाला भजन, कीर्तनाच्या माध्यमातून जागृत करण्याचे काम ते करतात. शेत पिकांमुळे नुकसान होऊन शेतकरी कर्जबाजारी झाला तर आत्महत्त्या हा पर्याय नाही. राज्याचे मुख्यमंत्री हे शेतकऱ्यांचे मंत्री आहेत. मागील आठवड्यात नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले. राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी विविध विकास योजना आणत आहे, शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेवून तसेच विविध आधुनिक कृषि तंत्राचा वापर करून आपली प्रगती करावी. शेतकरी आत्महत्या करणार नाही, याबाबत वारकरी, फडकरी यांनी पुढाकार घेऊन समाज प्रबोधन करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कृषिमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, परतीच्या पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याच्या माध्यमातून, राज्य व केंद्र सरकारकडून भरीव मदत करण्यात येणार आहे. नुकसानीची अंतिम आकडेवारी चार दिवसात हाती येईल. ३३ टक्के पाऊस झाला असेल त्या ठिकाणचा देखील पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच शेतीसाठी १२ तास वीजपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. निसर्गाच्या लहरीपणामुळे नैसर्गिक संकटे आली तर योग्य नुकसान भरपाई देऊ, कृषि मालाला चांगला व योग्य दर देण्याचा प्रयत्न करू, असेही ते म्हणाले.

बापूसाहेब देहूकर म्हणाले, शेतकऱ्यांनी आत्महत्या करायची नाही, हे संत तुकाराम महाराज यांनी चारशे वर्षांपूर्वी सांगितले आहे. समुद्राचे पाणी वाढत नाही, दुष्काळ पडला म्हणून कमी होत नाही, हे शेतकरी बांधवांनी लक्षात ठेवावे. परंतु, परिस्थिती शेतकऱ्यांना हतबल करते, त्यामुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो. सध्याचे शासन हे शेतकऱ्यांची काळजी घेणारे शासन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---

## राष्ट्रवादी महिला आघाडीत फूट

# शहर कार्याध्यक्षांसह अनेक पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी पक्षाचे शिर्डीमध्ये चिंतन शिबिर चालू असताना सोलापुरात राष्ट्रवादी महिला आघाडीला मोठे भगदाड पडले आहे. शिंदे गटाकडून राष्ट्रवादीला दे धक्का देत शहर कार्याध्यक्ष, विधानसभा अध्यक्षासह अनेक महिला पदाधिकाऱ्यांनी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला आहे. सोलापुरात राष्ट्रवादीला शिंदे गटाकडून हा मोठा दणका असल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रवादीमधील अंतर्गत धुसफुस आता चव्हाट्यावर आली आहे. जुने आणि नवे यांच्यातील वाद उफाळून आला आहे. त्याशिवाय शहरातील स्थानिक पदाधिकारी आणि निरीक्षकांच्या मनमानी कारभारामुळे मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्या रूपाने ही खदखद बाहेर आली आहे. कोल्हे यांनी आरोग्यमंत्री सावंत यांची भेट घेऊन लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले.

सोलापूर शहर राष्ट्रवादी महिला आघाडीच्या



पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत, संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शहरप्रमुख मनोज शेजवाल, दिलीपभाऊ कोल्हे, जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी दक्षिण विधानसभा अध्यक्षा सुनंदा साळुंके, शहर मध्य विधानसभा अध्यक्षा राजश्री कोडनूर, शहर कार्याध्यक्षा मनीषा नलावडे, शहर उपाध्यक्षा जयश्री पवार, शहर युवती महिला कार्यकारणी अश्विनी भोसले, शहर महिला कार्यकारणी मारता आसादे, शोभा गवळी यांच्यासह असंख्य महिला कार्यकर्त्यांनी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी उपजिल्हाप्रमुख तुकाराम नाना मस्के, उपजिल्हाप्रमुख संजय सरवदे, उपजिल्हाप्रमुख राजकुमार शिंदे, बाळासाहेब निकम, शशिकांत शिंदे उपस्थित होते.

---

# मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला मंजुरी : उपमुख्यमंत्री

## आवताडे शुगरच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

✔ सुराज्य/मंगळवेढा

**गेली अनेक वर्षे ज्या जोरावर निवडणुका होत होत्या, तो मंगळवेढा २४ गाव सिंचन योजनेला गती देऊन सर्व मान्यता घेतल्या असून नवीन दर सूचीप्रमाणे येत्या कॅबिनेटमध्ये या योजनेला मान्यता देणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.**



आवताडे शुगर डिस्टिलरीज् प्रायव्हेट लिमिटेड नंदूर येथे प्रथम गळीत हंगाम शुभारंभ व शेतकरी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, रणजितसिंह नाईक निंबाळकर, सचिन कल्याणशेट्टी, रणजितसिंह मोहिते पाटील, शहाजी पाटील, सुभाष देशमुख, राम सातपुते हे आमदार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार प्रशांत परिचारक उपस्थित होते.

फडणवीस पुढे म्हणाले, 'आ. समाधान आवताडे यांच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या जात आहेत. महात्मा बसवेश्वर व संत चोखामेळा स्मारक येत्या काळात पूर्ण होणार आहे. या सर्व मागण्या पूर्ण करून परत निवडणुकीसाठी ताठ मानेने निवडून येता येईल, असे काम आवताडे करत आहेत.

खासदार निंबाळकर यांची आग्रही मागणी असणारा पंढरपूर ते फलटण रेल्वे मार्गाचे काम सुरू करण्यासाठी येत्या आठ दिवसात निर्णय घेऊ होणार आहे. शुक्रवारी कार्तिक वारी निमित्ताने विठ्ठलाचे आशीर्वाद घेऊन अतिशय पुण्य कार्य करून मी आवताडे शुगर येथे आलो आहे. पांडुरंग हा सामान्य माणसाचा, कष्टकरी शेतकऱ्यांचा देव आहे. त्यांना सुजलाम् सुफलाम् कर, असे साकडे विठ्ठलाकडे मागितले आहे.

साखर कारखानदारीबाबत बोलताना ते म्हणाले, 'केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नामुळे सध्या कारखानदारी जिवंत आहे. एफआरपी वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. साखरेला एसएमपी देण्यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत. साखरेचे दर म्हणजे एसएमपी वाढविल्याने शेतकरी व कारखानदारांना फायदा झाला आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, 'उजनीच्या पाण्यावर अधिकार सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा आहे. त्यामुळे हे पाणी आता कोणी पळवून घेऊन जाणार नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या अथक परिश्रम व आशीर्वादाने हा कारखाना मंगळवेढा येथील शेतकऱ्यांसाठी समाधान आवताडे यांनी सुरू केला आहे. पंढरपूर मतदारसंघाच्या विकासासाठी आ. आवताडे यांनी खूप निधी खेचून आणला असल्याचे त्यांनी सांगितले.

आ. आवताडे म्हणाले, 'आवताडे शुगर हा केवळ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच सुरू झाला आहे. हजारो कामगारांच्या हाताला काम देणारी ही संस्था बंद पडता कामा नये. तालुक्याच्या विकासाला चालना देण्यासाठी ७१८ कोटी रूपयांचा निधी पाणी उपसा सिंचन योजनेस मिळणार असून या मतदारसंघावर देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत बारीक लक्ष आहे. या योजनेतील अनेक त्रुटी दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व येणाऱ्या काळात आपल्या हस्ते या योजनेचे उद्‌घाटन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मंगळवेढा तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रावर कोल्हापूर पद्धतीचे बॅरेजस, मंगळवेढा व पंढरपूर येथील ग्रामीण रुग्णालय, पंढरपूर एमआयडीसीचा प्रकल्प, मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्वर स्मारक व संत चोखामेळा स्मारक हे प्रश्न मार्गी लावावे, अशी मागणी त्यांनी केली.

सुराज्य सोलापूर
Classified
विवाह विषयक
● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(121122)

# फळवणीत वाघसदृश प्राण्यामुळे घबराट

✔ सुराज्य/वेळापूर

**फळवणी तालुका माळशिरस येथे पहाटेच्या सुमारास फळवणी गावालगत रोड क्रॉस करताना वाघ सदृश प्राणी दिसल्याने व त्याने एक कालवड व श्वान फस्त केल्याने फळवणी कोळेगाव तांदुळवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

फळवणी (ता. माळशिरस) येथील सांगोला वेळापूर रस्त्यावर गावालगत विशाल दूध संकलन केंद्र फळवणी याच्या शेजारी राहत असलेले शेतकरी नारायण प्रल्हाद आवताडे यांच्या रानात दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी घरालगत तीन कालवडे रानात बांधण्यात आली होती. त्यांची पत्नी सायंकाळी ६ च्या सुमारास ती कालवडे घरी आणण्यासाठी गेली असता त्यावेळी एक बारा महिन्याचे कालवाड फाडून खाल्ले असल्याचे दिसून आले. शेजारी सांडलेले रक्तही ताजे होते. यावरून नुकतेच कालवड खाल्ल्याचा कालवा झाला. गेली दोन दिवसापासून फळवणी परिसरात वाघ फिरत असल्याची ग्रामस्थांमधून चर्चा ऐकण्यास मिळत होती. त्यातच दि. ४ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास रात्री २.३० च्या सुमारास शिंदे नामक व्यक्ती हे आपल्या चारचाकी गाडीतून नातेवाईकांसह सांगोल्याहून फळवणीमार्गे आपल्या बावडा (ता. इंदापूर) या गावी चालले असताना त्यांना फळवणी गावाहून पुढे जाताना गावाच्या कॉर्नरला रोडच्या आतल्या बाजूला काहीतरी उभा असल्याचे त्यांना जाणवले त्याक्षणी काही अंतरावर चारचाकी वाहन थांबवून त्यांच्या नातलगाला वाघ असल्याचे दाखवून गाडी थांबवली आणि मोबाईलमधील व्हिडिओ चालू केला. काही सेकंदातच रोडच्या अलिकडल्या बाजूने वाघ रोड क्रॉस करून नारायण प्रल्हाद आवताडे यांच्या शेताच्या बाजूला गेला असल्याचे या व्हिडिओमध्ये दिसून आले.

शिंदे पाहुण्यांनी त्यांचे फळवणी येथील पाहुण्याला त्या क्षणाला तो व्हिडिओ पाठवून तुमच्या गावामध्ये फळवणी कॉर्नरला वाघ दिसला असल्याचे सांगितले. त्यानंतर ज्या पाहुण्याला फोन केला आहे, त्यांनी तो व्हिडिओ पाहून फळवणी गावचे सरपंच संजय पाटील, फळवणीचे पोलीस पाटील माया गणेश आवताडे यांना व्हिडिओ पाठवून वाघ फळवणी गावाजवळ आला असल्याची माहिती दिली. त्यानंतर सकाळी थोडे उजाडल्यानंतर गावचे सरपंच सचिन पाटील, पोलीस पाटील माया आवताडे, गणेश आवताडे व काही शेतकऱ्यांनी ज्या ठिकाणचा व्हिडिओ आहे. तो पाहिला आणि जागेची पाहणी केली असता तो काढलेला व्हिडिओ आणि ती जागा बरोबर होती. येथूनच वाघाने रोड क्रॉस करून नारायण प्रल्हाद आवताडे यांच्या शेतालगत रानात गेला असल्याची शक्यता असल्याने पोलीस पाटील माया गणेश आवताडे यांनी ग्राम सुरक्षा कॉलवरून फळवणी गावातील सर्व ग्रामस्थांना, रानातील शेतकऱ्यांना फळवणी गावाजवळ वाघ आला असून सर्वांनी आपली काळजी घ्यावी, असे आवाहन केले.



**ज्या ठिकाणाहून वाघाने रोड क्रॉस केला होता, त्या ठिकाणची पाहणी करताना वेळापूर पोलीस प्रभार अधिकारी निलेश बागाव, पोलीस पाटील माया आवताडे, फळवणी सरपंच सचिन पाटील व ग्रामस्थ दिसत आहेत.**

दरम्यान नारायण प्रल्हाद अवताडे यांच्या कालवडावर झालेला हल्ला व त्याचबरोबर पहाटेच्या सुमारास शेतकरी अवताडे यांचे बंधू नानासाहेब आवताडे यांच्या कुत्र्यावर पहाटेच्या सुमारास हल्ला करून त्याला मारले आहे. ही दोन्ही ठिकाणे जवळ जवळ असून ही घटना पाहण्यासाठी सकाळी फळवणी गावातील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.

या घटनेची माहिती पोलीस पाटील माया गणेश आवताडे यांनी वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस प्रभारी अधिकारी निलेश बागाव व माळशिरस वनपरिक्षेत्र अधिकारी दयानंद कोकरे यांना माहिती दिली होती. या दोन्ही अधिकारी बाराच्या सुमारास फळवणी गावातील जेथून वाघ दिसून आले.



## ‘वेडात मराठे वीर दौडले सात’ चित्रपटाचा भव्य मुहूर्त

✔ **सुराज्य/सोलापूर :** छ. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने व शेकडो मावळ्यांच्या बलिदानाने मराठा स्वराज्य उभारले गेले. स्वराज्य रक्षणासाठी प्राणांची आहुती दिलेल्या वीरांच्या आठवणींशिवाय महाराष्ट्राचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. नेसरींखिंडीत छत्रपती शिवरायांचे सरसेनापती प्रतापराव गुजर आणि त्यांच्या सहा शिलेदारांनी आपल्या आत्मबलिदानाने इतिहास अजरामर केला. प्रतापराव आणि त्यांच्या शिलेदारांचा हा अतुलनीय पराक्रम दिग्दर्शक महेश मांजरेकर ‘वेडात मराठेवीर दौडले सात’ या मराठी चित्रपटातून भव्य स्वरूपात घेऊन येत आहेत. प्रतापरावांच्या भूमिकेत असणारे अभिनेता प्रवीण तरडे यांच्यासह हार्दिक जोशी, विशाल निकम, विराट मडके, सत्य मांजरेकर, जय दुधाने, डॉ.उत्कर्ष शिंदे, नवाब शहा तसेच दिपाली सय्यद, शिवानी सुर्वे, गौरी इंगवले हे कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत. या कलाकारांसोबत हिंदीतील सुप्रसिद्ध अभिनेता अक्षय कुमार छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहे. कुरेशी प्रॉडक्शन आणि महेश मांजरेकर यांची प्रस्तुती असलेल्या ‘वेडात मराठे वीर दौडले सात’ चित्रपटाची निर्मिती कुरेशी प्रॉडक्शन यांची आहे. वसीम कुरेशी चित्रपटाचे निर्माते आहेत. पुढच्या वर्षी दिवाळीत हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची घोषणा एका दिमाखदार समारंभात नुकतीच करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे चित्रपटाला शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून यावेळी उपस्थित होते.




## वीरशैव लिंगायत प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा लवकरच

✔ **सुराज्य/अक्कलकोट:** मागील वर्षीच्या यशस्वी आयोजनानंतर यंदाच्या वर्षीही व्हीएलपीएल सिझन टू म्हणजेच वीरशैव लिंगायत प्रतिष्ठान आयोजित वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगचे आयोजन लवकरच करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत समाजातील खेळाडूंसाठीची ही स्पर्धा असून, मागील वर्षी लिंगायत समाजातील पाचशे खेळाडूंनी या लीगमध्ये सहभाग नोंदविला होता. या पत्रकार परिषदेस वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे या लीगचे संस्थापक अध्यक्ष केदारनाथ बिराजदार, कार्याध्यक्ष प्रशांत धुम्मा, उपाध्यक्ष निखिल थोबडे, स्वागताध्यक्ष सिद्धार्थ साल्लुकी, संचालक कैलास जेऊरे, सुनील शरणार्थी, गौरव जक्कापुरे, आकाश हरकुड उपस्थित होते.

## क्रीडा संघटनेतर्फे क्रीडांगणाच्या भाडे आकारणी विरोधात निवेदन

✔ **सुराज्य/सोलापूर :** शहरातील व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो मैदानांबरोबरच टेबल टेनिस हॉलसाठी भाडे आकारणी प्रस्ताव महापालिका प्रशासन आणू पाहत आहे. याला क्रीडा संघटनांनी विरोध केला आहे. सोलापूर जिल्हा व्हॉलीबॉल संघटना, सोलापूर जिल्हा कबड्डी संघटना, सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटना, याचप्रमाणे स्पोर्ट्स पॅव्हेलियनने निवेदन देऊन मैदानांसाठी कोणत्याही प्रकारची भाडे आकारणी करू नये, अशी मागणी केली आहे. व्हॉलीबॉल संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. बाळासाहेब भास्कर, सहसचिव मिलिंद गोरटे, खजिनदार ॲड. प्रशांत कांबळे, स्पोर्ट्स पॅव्हेलियनचे अध्यक्ष प्रकाश भुतडा, कबड्डी संघटनेचे मरगू जाधव, टेबल टेनिस संघटनेचे झेड. एम. पुणेकर आदींच्या शिष्टमंडळाने महापालिका उपायुक्त तथा स्टेडियम कमिटीचे सचिव मच्छिंद्र घोलप यांच्याकडे निवेदन सादर केले. मैदानाची व्यवस्था महापालिकेकडून होते, हे संघटना आणि खेळाडूंसाठी सहाय्यभूत ठरते. भाडे आकारणीचा थेट परिणाम खेळाडूंवर आणि खेळाच्या विकासावर होणार आहे. महापालिकेची भूमिका ही क्रीडा क्षेत्रासाठी सहकार्याची, पाठिंब्याची राहणे गरजेचे आहे. त्यामुळे स्टेडियम कमिटीच्या बैठकीमध्ये व्हॉलिबॉलसह कुठल्याही मैदानाला भाडे आकारणीचा प्रस्ताव पारीत केला जाऊ नये, अशी आपणास विनंती आहे. असे स्पोर्टस् पॅव्हेलियनच्या निवेदनात म्हटले आहे.

## कारची दुचाकीला धडक; चालकावर गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर:** रूपा भवानी मंदिरकडे जाणारा सर्विस रोडवरील डी मार्ट जवळ येथील टेक्सटाईल शोरूम समोर एका कारने दुचाकीला धडक देऊन दुचाकीचे नुकसान केल्याप्रकरणी कारचालकविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. २७ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी मनीषा अक्षय भुतडा (वय-४४, रा. भवानी पेठ, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून कार क्र. एम.एच.१२.बी.पी.७१२७ यातील कारचालक सिद्धार्थ कांबळे (रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी व फिर्यादी यांची मुलगी गौरी असे दोघे मिळून त्यांची दुचाकी क्रमांक एम. एच.१३.बीके.४५९५ यावरून डी मार्ट भवानी पेठ येथून घराकडे जात होते.त्यावेळी वरील ठिकाणी भरधाव वेगात येणाऱ्या कारने फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन फिर्यादी मनीषा भुतडा यांच्या चेहऱ्याला, पोटाला व गुडघ्यांना मार लागून जखमी झाल्या आहे. तसेच त्यांच्या मोटारसायकलीचे २० हजार रुपयाचे नुकसान झाले आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक नाईकवाडी हे करीत आहेत.

**चोरट्याने दुचाकी पळवली**

अज्ञात चोरट्याने गौरीशंकर मेडिकलच्या पाठीमागे बिलाल नगर येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.एपी.९११३ ही चोरून नेली आहे. याप्रकरणी पद्मराज मोहन ठोंबरे (वय-३५, रा. वैराग तालुका बार्शी, सध्या रा. बिलाल नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गवळी हे करीत आहेत.

## अग्नीवीर विशाल आटकळेचा कोळेगांव ग्रामस्थांनी केला सन्मान

✔ सुराज्य/वेळापूर

कोळेगावसारख्या खेड्यात रोज कुणाच्या तरी शेतात मोलमजुरीसाठी जाऊन आपला उदरनिर्वाह करून कुटुंब चालवणाऱ्या आईच्या कष्टाचे चीज व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या कोळेगाव ता माळशिरस येथील विशाल (रामा) शंकर आटकळे याची नुकतीच झालेल्या अग्नीपथ योजनेतून अग्निविर म्हणून निवड झाली आहे.



विशाल (रामा)ची घरची परिस्थिती अगदी बेताची असून त्याची आई सारिका आटकळे यांनी शेतात मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाची उपजीविका करतात. अशा परिस्थितीत ही त्यांनी आपल्या दोनपैकी एका मुलाला सैनिक भरतीसाठी प्रोत्साहित केले. परिस्थितीचा बाजार न भरवता त्याच परिस्थितीवर मात करून डौलाने उभे राहता आले पाहिजे. विशाल शंकर आटकळे याची वयाच्या २० व्या वर्षी अग्निविरमध्ये निवड झाली आहे. गरिबीशी झुंज देणारा विशाल आटकळे अग्निविर पास होताच गावकऱ्यांनी कोळेगाव ता माळशिरस येथे त्याचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. शहाजी पारसे यांनी केले तर संग्रामसिंह दुपडे, संतोष माने, पंकज दुपडे, श्रीधर सावंत, माऊली सावंत यांनी कौतुकस्पर मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी युवा वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी फळवणी गावचे सरपंच सचिन पाटील, पोलीस पाटील माया गणेश आवताडे पोलीस उपनिरीक्षक संजय राऊत, पोलीस कॉन्स्टेबल अमोल वाघमोडे, तसेच वनरक्षक पिलीव गणेश जगदाळे, मळोली वनरक्षक भोजने एस. एस., पाणीवाटप संस्था चेअरमन जाधव, फळवणी ग्रामस्थ उपस्थित होते.



## पंढरपूर तीर्थक्षेत्राला कॉरिडॉर बनवावे

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वारकऱ्यांची मागणी

✔ सुराज्य/पंढरपूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात देशातील महत्वाच्या धार्मिक स्थळांना अत्याधुनिक स्वरूप देऊन तेथे भव्य कॉरिडॉर निर्मितीचे कार्य जोरात सुरू आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर तीर्थक्षेत्राला कॉरिडॉर बनविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी भावना समस्त वारकऱ्यांनी भक्त पुंडलिक घाटावर केली आहे. तसेच चंद्रभागा नदीच्या दोन्ही तीरांवर संतांच्या नावाने १८ घाटांची निर्मिती करण्याची मागणी केली आहे.

विश्वशांती केंद्र (आळंदी) माईर्स एमआयटी पुणे, भारत व श्रीक्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीच्यावतीने पवित्र चंद्रभागेची आरती या नित्य उपक्रमाचा एक भाग म्हणून कार्तिक शुद्ध एकादशीच्या पूर्व संध्येला भक्त पुंडलिक घाटावर हभप महादेव रामचंद्र महाराज यादव यांच्या हस्ते आरती संपन्न झाली.

याप्रसंगी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, उषा विश्वनाथ कराड, हभप रामचंद्र महाराज यादव, बंगलोर येथील कृष्णा महाराज आमले, प्रा. डॉ. टी. एन. मोरे, दत्तात्रय बडवे, डॉ. महेश थोरवे हे उपस्थित होते.

याप्रसंगी रामचंद्र महाराज यादव लिखित श्री गुरू साखरे सांप्रदायिक विचार सागर या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, ‘स्वप्न व संकल्प असेल तर कोणतेही कार्य पूर्णत्वास नेता येते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर पुल ते गोपाळ पूरापर्यंत १८ अध्याय व १८ संतांच्या नावाने घाटांची उभारणी करावे प्रा. डॉ. टी. एन. मोरे म्हणाले, ‘शिक्षणाबरोबर भारतीय संस्कृती व परंपरा संपूर्ण देशात पोहचविण्याचे कार्य डॉ. कराड करीत आहेत. त्यांनी ज्ञानाबरोबरच आध्यात्मिक क्षेत्रात केलेले कार्य अतुलनिय आहे. महाराष्ट्रात प्रथमच चंद्रभागेची आरती सुरू करुन आध्यात्मिक भूमित वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

शालिग्राम खंदारे यांनी सूत्रसंचालन केले. महेश नलावडे यांनी आभार मानले.

## ज्येष्ठ कलावंतांचा आज सन्मान

✔ **सुराज्य/सोलापूर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्यावतीने मराठी रंगभूमी दिनानिमित्त सोलापुरातील ज्येष्ठ नाट्य कलावंत व मार्गदर्शकांचा सन्मान नाट्य परिषदेच्या स्व. पद्माकर देव सभागृह मोदीखाना, मोदी सोलापूर येथे शनिवार दि. ५ नोव्हेंबर रोजी सायं ६ वा. नरेंद्र गंभीरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

विद्या काळे, शशिकांत लावणीस, मल्लिकार्जुन कावळे, जे. जे. कुलकर्णी, राजाराजेशचंद्र, शरदकुमार एकबोटे, शुकूर सय्यद, पांडुरंग चौधरी, दीपक आहेरकर, रामकृष्ण अघोर या मान्यवरांचा सन्मान याप्रसंगी होणार आहे.


सोलापूरची रंगभूमी समृद्ध व सकस ठेवण्यासाठी या मान्यवरांनी यथाशक्ती प्रयत्न केले आणि करत आहेत. दयानंद महाविद्यालयाची मुक्तीधाम ही एकांकिका सादर होणार आहे. तरी याप्रसंगी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी केले आहे.

## नारायण चव्हाण यांचा रविवारी सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

✔ **सुराज्य/सोलापूर :** कुमठे हायस्कूल कुमठे (ता. उत्तर सोलापूर) येथील शिक्षक नारायण चव्हाण हे आपल्या प्रदीर्घ सेवेतुन निवृत्त होत आहेत. यानिमित्त रविवार दि. ६ नोव्हेम्बर रोजी प्रसिद्ध नेत्र विशारद पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते त्यांच्या सत्कार सो

हळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी चार वाजता डॉ. निर्मलकुमार फड्कुले सभागृहात होणाऱ्या या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिद्धेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी असणार आहेत. तर आमदार सुभाष बापू देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. धनंजय माने, गोकुळ शुगर्सचे चेअरमन दत्ता शिंदे, जयहिंद शुगर्सचे चेअरमन गणेश माने देशमुख, जकराया शुगर्सचे कार्यकारी संचालक सचिन जाधव आदी मान्यवर प्रमुख आतिथि म्हणून उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन गौरव सोहळा समितीचे सदस्य शिवा बाटलीवाला, संगीता जाधव, ॲड. बापू देशमुख, शिवानंद पाटील, एजाजहुसेन मुजावर, दत्ता थोरे, चन्नवीर भद्रेस्वरमठ, संतोष पवार, प्रा. डॉ. किशोर थोरे, प्रशांत माने आदिनी केले आहे..

## मल्लय्या गड्डम यांचे निधन



✔ **सुराज्य/सोलापूर :** न्यू पाछा पेठ, विजयनगर येथील राहिवाशी मल्लय्या रामदास गड्डम यांचे दि.४ रोजी सकाळी वृद्धापकळाने निधन झाले.त्यांचे वय ८० वर्षे चे होते.त्याच्या मागे दोन मुलं, दोन मुली, सून नांतवंडे असा परिवार आहे. ते सो.म. पा. परिवाहन उपक्रमकडील लक्ष्मीनारायण गड्डम व सिहंगड कॉलेज येथील प्राध्यापक व्यकटेश गड्डम यांचे वडील होत.

# नेहरूनगरमध्येही तीन दिवसाआड पाण्याचे नियोजन सुरू

## पालिका आयुक्त शिवशंकर यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी प्रशासनाचे लक्ष आहेच. स्मार्ट सिटी अंतर्गत एबीडी एरियामध्ये चार दिवसात दोन वेळा पाणी येते. जुळे सोलापुरातील काही भागामध्ये ४ दिवसाऐवजी ३ दिवसाआड पाणी येत आहे. आता उपनगरात नेहरूनगर आणि अन्य ठिकाणीही तीन दिवसाआड पाणी येईल अशा पद्धतीने नियोजन झाले आहे. भविष्यात इतरही अनेक भागात असे नियोजन करण्याचा प्रयत्न राहील, पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.

ते पुढे म्हणाले, ‘रोज पाणीपुरवठा किंवा एक दिवसाआड पाणीपुरवठा या दृष्टीने नियोजन होत असताना पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे निदर्शनास आले. सार्वजनिक नळ वाहत असतात, अनेक ठिकाणी पाईपलाईन मग त्या खाजगी असो किंवा सरकारी फुटलेल्या असतात. त्यातून पाणी वाहते, गावठाण भागामध्ये अनेक ठिकाणी पाणी येण्याच्या दिवशी रस्त्यावर पाणी वाहते. यात साठलेलं पाणी ड्रेनेजमध्ये ओतून देतात आणि जिथे नळ फुटलेले आहेत त्याचेही पाणी वाहत असते, असेही निदर्शनास आले आहे. एचआरसी सारखी आणखी एक टाकी नियमित भरून त्याद्वारे पाणी सोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे

### बदली होईल तेव्हा होईल, तोपर्यंत कामाचा निपटारा करणार

शासनाकडे बदलीसाठी आपण मागणी केली होती त्यांच्याकडे आपला अर्ज प्रलंबित आहे. तोपर्यंत सोलापूर शहरातील प्रत्येक कामाचा ठरल्याप्रमाणे निपटारा करण्यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत, असे पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले. ते म्हणाले दिल्ली येथे आपण ज्या विभागातून आलो आहोत तिथे मुलाखतीसाठी जाऊन आलो हे सत्य आहे पण शासनाने अद्याप यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही.

शासनामध्ये काम करत असताना आदेश येईल त्याप्रमाणे काम करत राहणं याला महत्त्व असते, त्याप्रमाणे आपण काम करत आहोत बाकी बदलीच्या इतर चर्चांमध्ये मला रस नाही, असेही ते म्हणाले.

### स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कामाची यादी मागवली

पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाच्या निधीतून करावयाच्या कामांची यादी घेतली आहे. यावर मी निर्णय घेणार नसून ही यादी एकत्रित करून अंतिम मंजुरीसाठी ती जिल्हा नियोजन बैठकीपुढे सादर करण्यात येईल, अशी माहिती पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.

**जाहीर नोटीस**

मी, **श्रीमती रुकसाना समीर शेख रा. २६७/६४, रविवार पेठ, सोलापूर** वरील पत्त्यावरची रहीवाशी असून माझे पती कै. समीर दाऊद शेख हे दिनांक ११/०८/२०२१ रोजी मयत झाले असून माझे पतीच्या नावे बजाज कंपनीचे रिक्षा वाहन क्र. MH-13-BV-0690 व रिक्षा परवाना नं. MH13/23/SHR/1999 असून मी धर्मपत्नी या नात्याने वरील रिक्षा परवाना माझे नावे करण्यासाठी मा. आरटीओ साहेब, सोलापूर यांचेकडे विनंती अर्ज केला आहे. तरी कोणाची हरकत असल्यास त्यांनी ८ दिवसांच्या आत माझे खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**श्रीमती रुकसाना समीर शेख**

रा. २६७/६४, रविवार पेठ, सोलापूर.

**मो.नं.-८१७७८६७७७६**

# लोकनेता

## आमदार सचिन(दादा) कल्याणशेट्टी

जमलेल्या गर्दीचा नेतेगिरीसाठी उपयोग करून घेऊन आपली उंची वाढविणारे नेते आजकाल सर्वत्र दिसतात परंतु अशा सवंग पुढारीपणाचा बुडबुडा फार काळ टिकत नाही. दुसरीकडे विकासकार्याची जाण, दूरदृष्टी व लोकांसाठी अहोरात्र कष्ट करत विधायक कार्यातून नेतृत्व सिद्ध करणारे सचिन दादांसारखे नेते हे अक्कलकोट व दक्षिण तालुक्यासह जिल्ह्याला लाभलेले वरदानच म्हणावे लागेल. स्व.पंचप्पा कल्याणशेट्टी सरांसारख्या भाजपचा कर्मठ नेत्यासारख्या विधायक कार्यास वाहून घेणाऱ्या पित्याच्या सहवासात सचिन दादांना लोकसेवेचे बाळकडू मिळाले. मात्र सरांच्या नंतर अक्कलकोटच्या राजकारणात प्रस्थापितांना शह देऊन,एक तरुण नेतृत्व म्हणून सचिन दादांनी केलेला संघर्ष आम्हा कार्यकर्त्यांनी डोळ्याने पाहिला आहे. तालुकाध्यक्ष म्हणून काम करत असताना दादांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत तरुण कार्यकर्त्यांची जी फळी उभा केली त्याचा फायदा पक्षाला लोकसभा निवडणुकीत झाला. या मतदारसंघात काँग्रेसचा आमदार असतानाही भाजपला ४८ हजार मतांचे लीड मिळाले. दादांनी पक्षातील लहानांपासून थोर कार्यकर्ते व नेत्यांना सोबत घेऊन जी मोट बांधली यामुळे विधानसभा निवडणुकीत पाहिल्याचवेळी त्यांनी विद्यमान आमदाराला ३७ हजार पेक्षा जास्त मताधिक्याने पराजित केले. तरुण मित्रांना सोबत घेऊन मतदारसंघातील प्रत्येक गावाला भेटी देत वास्तवाचा अभ्यास करणारे सचिन दादा आपल्या कृतीतून लोकांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामुदायिक विवाह सोहळा, रक्षाबंधन कार्यक्रम, गणेशोत्सव व्याख्यानमाला असे त्यांचे कार्य सर्व सामान्य जनतेकरिता सुरू आहे. कमी वयात जिल्हाध्यक्ष झालेले सचिन दादा सर्वात तरुण जिल्हाध्यक्ष आहेत. प्रत्येक कार्यक्रमाचे जिल्ह्यातील प्रत्येक मंडलात योग्य नियोजन दादांनी अल्पावधीतच केले आहे. याची प्रचिती नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात केलेल्या सेवा पंधरवडा कार्यक्रमाच्या माध्यमातून दिसून आली. देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षातील वरिष्ठांचा विश्वास त्यांनी जिंकला आहे. अल्पावधीतच त्यांनी टीम देवेंद्रमध्ये प्रामाणिकपणामुळे स्थान मिळवले आहे.



- सागर खांडेकर




# युवकांचे आयकॉन मनिष देशमुख



अल्पावधीतच आपल्या कार्य कर्तृत्व व मनमिळावू स्वभावाने सोलापूर जिल्ह्यातील राजकीय पटलावर उमटलेले नाव म्हणजे मनिष सुभाष देशमुख होय. जनतेचे प्रश्न जनतेमध्ये सोडविणारे, सामाजिक भान जपणारे, युवकांच्या रोजगारासाठी कटिबद्ध असणारे व युवकांबद्दल प्रचंड दूरदृष्टी असणारे नेते म्हणजेच आमचे मनिष भैय्या देशमुख. ते अल्पावधीतच युवकांचे आयकॉन बनले आहेत.

उद्याच्या सोलापूरच्या राजकारणातील आशादायक नेतृत्व व सोलापूर जिल्ह्यातील युवकांचे आयकॉन, भारतीय जनता युवा मोर्चाचे तरुण तडफदार व अभ्यासू नेतृत्व, सुभाष बापूंचा सामाजिक व राजकीय वारसा दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघसह जिल्ह्यात समर्थपणे चालविणारे एक लोकप्रिय युवा नेते मनिष देशमुख हे आज फक्त एका विशिष्ट मतदारसंघापुरते मर्यादित राहिलेले नेतृत्व नाही. संपूर्ण सोलापूर जिल्हा हा त्यांच्या कार्याची दखल घेत आहे, याचे कारण त्यांचा मनमिळावू स्वभाव,व पाठपुरावा करून प्रश्न सोडविण्याची पद्धत. कोरोना काळात जिल्ह्यातील रुग्णांना सोलापूर शहरात उपचारासाठी येणारी अडचण लक्षात घेता,त्यांनी सुरू केलेले वॉर रूम व त्या माध्यमातून त्यांनी केलेले रुग्णांना मदत, मग रुग्णांना बेड उपलब्ध करून देण्यापासून,रेमडीसीवर उपलब्ध करून देणे व नातेवाईकांना जेवणाची सोय करणे हे त्यांनी खरोखरच त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने हाताळले व याची नोंद शहर व जिल्ह्यातील माध्यमांसह नागरिकांनी सुद्धा घेतली व यामुळेच त्यांच्याकडे जिल्ह्यातील नवे उगवते पर्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. तरुणांपासून ते ज्येष्ठांपर्यंत हे नाव आज आदराने घेतले जाते,याचे मुख्य कारण म्हणजे त्यांची कार्य पद्धती व संघाच्या कुशीत तयार झाल्यामुळे लहानपणापासून घडलेले संघ संस्कार याची प्रचिती. वाढदिवसानिमित्ताने कोणताही गाजावाजा न करणे ही बापूंची पूर्वीपासून घातलेली परंपरा त्यांनी ही तशीच सुरू ठेवली व कार्यकर्त्यांनी सुद्धा तसाच पद्धतीने त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक व लोकप्रयोगी कार्यक्रम करण्याचा प्रयत्न केला आहे.







